लोकमत

# अंतिम सत्र परीक्षांबाबतचा अहवाल सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाच्या अंतिम सत्राच्या परीक्षांबाबतचा अहवाल १८ सदस्यीय समितीने सादर केला आहे. त्यावर अंतिम निर्णय बुधवारी (दि. २७) होणाऱ्या विद्या परिषदेच्या बैठकीत होणार आहे.

या अहवालात परीक्षेचे स्वरूप, परीक्षा घेण्याबाबतचे नियोजन कसे करावे यासह प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे मूल्यमापनाची पद्धती, आदींबाबत विविध शिफारसी केल्या आहेत. दरम्यान, विद्यापीठातील निवडक २९ प्राचार्यासमवेत आज, मंगळवारी दुपारी एक वाजता ऑनलाईन बैठकमध्ये कुलगुरु, प्र-कुलगुरू चर्चा करणार आहेत.

## परीक्षेचे वेळापत्रक ठरविण्याबाबत घाई नको

अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याबाबतचा निर्णय कोरोनाची तीव्रता पाहून राज्य शासन घेणार आहे. कुलपती, विद्यापीठ अनुदान आयोग आणि राज्य शासनाच्या मान्यतेने परीक्षा घ्यावी लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठाने परीक्षा वेळापत्रक ठरविण्याची घाई करू नये, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने सोमवारी पत्रकाद्वारे केली.

Kolhapur Main
Page No. 2 May 26, 2020
Powered by: erelego.com

# अंतिम सत्राच्या परीक्षांचा दोन दिवसात निर्णय

प्रतिनिधी
मुंबई

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे राज्यातील विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भातील विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही असाच विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेतला जाणार आहे. या संदर्भातील आराखडा दोन दिवसात तयार करण्यात येणार असल्याची माहिती उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

राज्यातील कुलगुरू आणि सामंत यांच्यात व्हिडीओ



कॉन्फरन्सच्या माध्यमातून बैठक झाली. सामंत म्हणाले, अंतिम सत्राच्या परीक्षेसंदर्भात काय निर्णय घ्यावा, याबद्दल राज्यपालांशी चर्चा झाली. राज्य समिती दोन दिवसांमध्ये परीक्षेसंदर्भात आराखडा तयार करून राज्यपाल आणि राज्य सरकारला सादर करेल. एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची दक्षता घेण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले.

तरुण भारत Tue, 26 May 2020
https://epaper.tarunbha